वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी

विद्यापीठाने निर्मिती केलेले सुधारीत व संकरीत वाणाबद्दल सर्व समावेशक व सविस्तर माहिती

अ.क्र.	तपशील		सविस्तर माहिती
१	पीक/वाणाचे नाव		सीताफळ : धारुर-६
२	प्रसारीत केल्याचे वर्ष		२०१४-१५
३	प्रसारीत करणारी संस्था/विद्यापीठ		वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी
४	जमीन		मध्यम व हलकी उत्तम निचरा होणारी
५	हवामान		उष्ण व कोरडे हवामान लागते
६	पेरणी/लागवडीचा कालावधी		जून ते सप्टेंबर या कालावधीत
७	प्रती एकर कलम		१८०
८	पीक व्यवस्थापन		
	१	लागवडीचे/पेरणीचे व्यवस्थापन	सीताफळाच्या उपयुक्त वाढीसाठी उष्ण व कोरडे हवामान लागते. अति थंड व पानथळ भागात याची यशस्वी लागवड करता येत नाही. फुलधारणेच्या कालावधीत उपयुक्त फळधारणेसाठी बागेत आर्द्रतायुक्त सौम्य तापमानाची आवश्यकता असते. अती थंडी व अती पाऊसमान या झाडास मानवत नाही. मध्यम ते हलकी जमीन उत्तम निचरा होणारी भरपुर सेंद्रीय पदार्थ व सामू ६.५ ते ८.० दरम्यान असलेली जमीन सीताफळ लागवडीस योग्य समजली जाते. भारी जमीन पाण्याचा निचरा न होणारी सीताफळ लागवडीस अयोग्य समजली जाते. सर्वसाधारणपणे जून ते सप्टेंबर या कालावधी दरम्यान सीताफळाची लागवड यशस्वीरीत्या करता येते. किंवा जानेवारी-फेब्रुवारी या कालावधीतही सीताफळाची लागवड करता येते.
	२	खत व्यवस्थापन	सीताफळ बागेत प्रती झाड प्रती वर्षी २५०:१२५:१२५ ग्रॅम नत्र, स्फुरद व पालाश रायासनिक खताद्वारे द्यावेत. पिकाची स्फुरदाची मात्रा सिंगल सुपर फॉस्फेट मधुन दिल्यास स्फुरदासह गंधक आणि कॅल्शीयम देखील पिकास मिळते सेंद्रीय खतामध्ये शेणखत अथवा कंपोस्ट अथवा गांडुळखत २५ किलो ग्रॅम, ॲझोटोबॅक्टर २५ ग्रॅम, पिएसबी २५ ग्रॅम, प्रती झाड प्रती वर्षी द्यावे. याशिवाय जून जुलै मध्ये हिरवळीची खते उदा. ताग धैंचा अशी पिके पेरुन फुले येण्याच्या अगोदर जमिनीत गाढुन टाकाव्यात. तसेच मॅग्नेशियम सल्फेट १०० ग्रॅम शेणखताबरोबर बोरॅक्स ५० ग्रॅम, जस्त सल्फेट १०० ग्रॅम प्रती झाड प्रती वर्षी द्यावे. **आंतरपिके व तणनियंत्रक :** सीताफळाची लागवड हलक्या

			जमिनीत केली जात असल्यामुळे अशा जमिनीचा पोत व कस टिकविण्यासाठी लागवडीनंतर सुरुवातीलाच दोन तीन वर्ष खरीप हंगामात तुर, चवळी, भुईमूग, सोयाबीन, जवस, स्टायलो यासारखी आंतरपिके घेणे फायदेशीर ठरते. मात्र सीताफळाच्या झाडापेक्षा उंच वाढणारी मका, ज्वारी, बाजरी यासारखी पिके आंतरपिके म्हणुन घेवु नयेत. बागेतील तण हे अन्नद्रव्ये, पाणी सुर्यप्रकाश, हवा यासाठी सीताफळाच्या झाडाशी स्पर्धा करते त्यामुळे सीताफळाचे उत्पादन कमी होते. म्हणुन वेळोवेळी खुरपणी करुन तणे काढुन टाकावीत. ताग, धैंचा यासारखी पिके सीताफळाच्या झाडामधील मोकळया जागेत घेतल्यास तणाच्या वाढीस प्रतीबंध होतो. आणि या पिकाचा हिरवळीची खते म्हणुनही उपयोग होतो. आच्छादन व तणनाशके वापरुनही तण नियंत्रण करता येते.
	३	**पाणी व्यवस्थापन**	सीताफळ हे कोरडवाहू फळपिक असल्याने पाण्याची जास्त गरज भासत नाही. परंतू बागेत जर ठिबक सिंचनाचा कार्यक्षम वापर केल्यास भरपुर फायदा होऊन उत्पन्नात भरीव वाढ होऊन उत्तम गुणवत्तेची फळे मिळतात. ठिबक सिंचनामुळे ५०-७० टक्के पाण्याची बचत होते. तणाचा प्रादुर्भाव कमी होतो. तसेच ठिबकचा वापर करताना झाडाच्या पाण्याच्या आवश्यकतेनुसार ड्रिपरचा वापर करावा. सीताफळ बागेत तणाचा प्रादुर्भाव कमी करणे, पाण्याचा कार्यक्षम वापर व पाण्याची बचत करण्यासाठी आच्छादनाचा वापर करावा. यासाठी पॉलीथीनची पट्टी अथवा पालापाचोळा ऊसाचे पाचट, वाळलेल गवत, लाकडाचा भुसा इ. वापर करावा. सीताफळ बागेत आच्छादन केल्यास जमिनीतील पाण्याचे विभाजन चांगल्याप्रकारे होऊन त्या पाण्याचा उपयुक्त वापर फळझाडे करतात. बाष्पीभवनाचा वेग मंदावतो. अन्नशोषण करणा-या मुळांची कार्यक्षमता वाढते त्यामुळे खताचा कार्यक्षम वापर केला जातो.
	४	**कीड व्यवस्थापन**	सीताफळावर नुकसानकारक असणारी कीड म्हणजे पिठ्या ढेकुन या किडीचे प्रौढ जमिनीत, सालीच्या खाली, फांद्यांच्या फटीत राहतात. त्याच्या नियंत्रणासाठी पाणगळ झाल्यावर झाडाची छाटणी करावी. बागेत पडलेली पाने, फांद्या, झाडावर लटकणारी काळी पडलेली फळे काढुन त्याची विल्हेवाट लावावी. त्यामुळे सुप्तावस्थेत गेलेल्या किडींचा नाश होतो. साधारणतः पावसाळयाच्या सुरुवातीच्या काळात मे-जून मध्ये पिठ्या ढेकणाची पिले जमिनीतुन खोडावर चढतात. त्यांच्या नियंत्रणासाठी बागेतील जमिनीची नांगरट करुन घ्यावी व जमीन चांगली तापु द्यावी. त्यामुळे जमिनीत असणा-या किडींचा नाश होतो पिठ्या ढेकणाची पिले खोडावर चढु नयेत यासाठी मे-जून मध्ये १५ ते २० सेमी रुंदीची प्लास्टीकची पट्टी खोडावर व्यवस्थीत लावुन त्यावर ग्रीस लावावे त्यामुळे पिल्ले ग्रीसला चिकटुन मरुन जातात. तसेच

			क्रिप्टोलीमस मॉट्रोझायटी या परोपजीवी किटकामुळे पिठ्या ढेकणाचे प्रभावी नियंत्रण करता येते. त्याकरीता प्रती एकर १००० ते १५०० भुंगेरे सायंकाळी बागेत सोडावेत.
	५	**रोग व्यवस्थापन**	निरंक
९	**पिकाचा कालावधी**		बहुवार्षिक
१०	**उत्पादकता**		७.४० टन/प्रती हेक्टरी
११	**वाणाची वैशिष्ट्ये/विशेष गुणधर्म**		१. फळाचे सरासरी वजन ३८६.६६ ग्रॅम २. गराचे वजन १८०.३४ ग्रॅम ३. गराचे प्रमाण ४७.४५ टक्के ४. प्रती झाड ११.३७ किलो ग्रॅम उत्पादन ५. विद्राव्य घटकाचे प्रमाण २४.४९ ब्रिक्स
१२	**वाणासंबंधीचे छायाचित्रे**		